मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांची विविध प्रकल्पांना भेट

## घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांना भेट : सदरचे प्रकल्प पर्यावरणपुरक व स्टेट ऑफ दि आर्ट संकल्पनेवर आधारित



**पिंपरी | प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त कैलास शिंदे व शहर अभियंता शिरिष आरदवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनांतर्गत मोशी येथे कार्यान्वित असलेल्या विविध प्रकल्पांना भेट दिली. सदर भेटीदरम्यान वेस्ट टू एनर्जी प्रकल्प तसेच हॉटेल वेस्ट टू बायोगॅस व राडारोडा व्यवस्थापन केंद्राच्या तांत्रिक बाबींसह प्रकल्प उभारताना येणाऱ्या आव्हानांबाबत आयुक्त कैलास शिंदे यांनी इत्यंभूत माहिती घेतली.

पिंपरी चिंचवड शहरात निर्माण होणाऱ्या एकुण घनकचऱ्यावर तसेच बांधकाम राडारोड्यावर मनपा मार्फत करण्यात येणाऱ्या संकलन व प्रक्रिये बाबत संजय कुलकर्णी (मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका) यांनी उपस्थितांना सादरीकरणासह विस्तृत माहिती दिली. आयुक्त कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त कैलास शिंदे व शहर अभियंता शिरिष आरदवाड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनांतर्गत मोशी येथे कार्यान्वित असलेल्या विविध प्रकल्पांना भेट दिली. प्रकल्प यशस्वीरित्या उभारुन कार्यान्वित ठेवले बाबत पिंपरी चिंचवड मनपाचे अभिनंदन केले. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरात निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या घनकचऱ्यावर महानगरपालिकेमार्फत करणेत येणाऱ्या शाश्वत व पर्यावरणपुरक प्रक्रिये बाबत संपूर्ण माहिती घेतली, त्यानुसार सदरचे प्रकल्प पर्यावरणपुरक व स्टेट ऑफ दि आर्ट संकल्पनेवर आधारित असून सर्व आव्हानांचा सामना करुन पूर्ण केले असले बाबत मनपाचे कौतुक केले.

या पहा दौऱ्यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेचे शहर अभियंता शिरिष आरदवाड, कार्यकारी अभियंता राजेश पवार, उप अभियंता जितेंद्र रावळ तसेच पिंपरी चिंचवड मनपाचे उप अभियंता योगेश आल्हाट उपस्थित होते. सदर भेटीदरम्यान वेस्ट टू एनर्जी प्रकल्प तसेच हॉटेल वेस्ट टू बायोगॅस व राडारोडा व्यवस्थापन केंद्राच्या तांत्रिक बाबींसह प्रकल्प उभारताना येणाऱ्या आव्हानांबाबत आयुक्त कैलास शिंदे यांनी इत्यंभूत माहिती घेतली.

# पिंपरीच्या 20, तर भोसरीच्या 23 फेऱ्या होणार

## मतमोजणी म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात होणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात होणार आहे. मतमोजणी प्रक्रिया शनिवार (दि.२३) सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. मतमोजणी पूर्ण होऊन दुपारी दोन वाजेपर्यंत निकाल समजेल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली आहे.

बुधवारी (दि.२०) रोजी मतदान झाले आहे. आता निवडणूक विभागाकडून मतमोजणीसाठी मतमोजणी कक्षाची तयारी सुरू झाली आहे. मतमोजणी टेबलांची रचना करण्यात येत आहे. टेबल कर्मचारी नेमण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलसाठी तीन मोजणी अधिकारी, एक शिपाई असे चारजणांचे एक पथक आहे

मोजणी अधिकारी व कर्मचाऱ्यांना पहिले प्रशिक्षण देण्यात आले आहे. पिंपरीसाठी २० टेबलांवर मतमोजणी होणार असून, त्याच्या २० फेऱ्या होणार आहेत. तर भोसरीच्या मतमोजणीसाठी २२ टेबलांवर २३ फेऱ्या होतील. टपाली व इलेक्ट्रोल व्होटच्या मोजणीसाठी स्वतंत्र टेबल मांडण्यात येणार आहेत. त्यासाठी स्वतंत्र मोजणी पथकेही नेमण्यात आली आहेत.

मतमोजणी सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये मतदारांचा कल स्पष्ट होईल. त्यामुळे दुपारी बारानंतर निकालाचा कल स्पष्ट होईल. तसेच दुपारी दोनपर्यंत संपूर्ण निकाल हाती येऊ शकेल असा अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# चिंचवड विधानसभेच्या मतमोजणीसाठी 29 टेबल, 24 फेऱ्या होणार

## मतमोजणी प्रक्रिया थेरगाव येथील स्व. शंकर (अण्णा) गावडे स्मृती कामगार भवन येथे पार पाडणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघात विजयाचा गुलाल आम्हीच उधळणार असा दावा पिंपरी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी केला आहे.

२०१९-२४ या पाच वर्षात केलेल्या कामाच्या जोरावर जनतेने टाकलेला विश्वास आमच्या विजयासाठी महत्त्वपूर्ण आहे. महायुती सरकारने केलेली विकासकामे, लाडकी बहीण योजना तसेच जनकल्याणकारी विविध योजना यामुळे मतदारांना दिलासा मिळाला. शहरातील मेट्रोचा निगडी पर्यंतचा विस्तार याच बरोबर मनपाचे विविध प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प यामधून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला. मतदारसंघातील झोपडपट्टी तसेच मध्यमवर्गीय व सोसायट्यांमधील नागरिकांशी मी वैयक्तिक संपर्कात आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या, प्रश्न सोडविण्यावर माझा भर असतो. प्रत्येक घटक तसेच सर्वसामान्य मतदारांचा माझ्यावर विश्वास आहे. मी सामान्य जनतेची केलेली कामे अशा विविध कारणामुळे विजय आमचा आहे, त्यामुळे गुलाल आम्हीच उधळणार आहोत असे आमदार अण्णा बनसोडे यांनी म्हटले आहे.

# मनिकर्णिका लाईफ टाईम अॅवार्डने उद्योजिका वंदना चौव्हाण यांचा सन्मान

## तीस वर्षापासून अनोख्या क्षेत्रात चिकाटीने केलेल्या कार्याची पावती

**पिंपरी| मनीषा थोरात-पिसाळ**

विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या उद्योजिकांचा सन्मान वी केयर फाऊंडेशन तर्फे करण्यात आला. त्यामध्ये पिंपरीतील उद्योजिका वंदना चौव्हाण यांना मनिकर्णिका लाईफ टाईम अॅवार्ड २०२४ ने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथे पार पडलेल्या सोहळ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २ हजार आठशे अशा विविध क्षेत्रातून महिला उद्योजिकांचे नामांकन आले होते. त्यात शंभर उद्योजिकांना फायनलिस्ट करून, त्यातील तीस विशेष पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये पिंपरीतील उद्योजिका चौव्हाण यांचा समावेश होता. व्ही केअर वेल्फेअर असोसिएशन ही सामाजिक संस्था आहे. मागील तेरा वर्षापासून शैक्षणिक, क्रीडा, बेरोजगारी, वैद्यकीय अशा क्षेत्रात कार्यरत आहे. या संस्थेकडून महिला उद्योजिकांना राज्य पातळीवर ओळख निर्माण करून देणे, तसेच त्यांच्या उद्योगाला गतिमान करणे हा उद्देश ठेवून त्यांना पुरस्काराने सन्मानित करते. या पुरस्कारासाठी अध्यक्ष तुषार रसाळ आणि मॅजिकल चारमंटच्या संचालिका समृद्धी पाटील यांच्यासह पॅनलवरील इतर मान्यवरही उपस्थित होते. वंदना चौव्हाण यांना मिळालेल्या 'मनिकर्णिका लाईफ टाईम अॅवार्ड' २०२४ ने शहराच्या नावलौकिकात भर पडलीआहे. इंजिनियर असलेल्या चौव्हाण यांनी मागील तीस वर्षापासून स्वतःच्या जिद्दीवर अनोख्या क्षेत्रात ठसा उमटविला. इलेक्ट्रीक कन्सल्टंट म्हणून त्यांनी शहरातच नव्हे तर महाराष्ट्रभर उल्लेखणीय प्रकल्प पूर्णत्वास नेले आहेत. शहरातील अनेक प्रकल्पासोबत नामांकित असेलेले अटलबिहारी वाचपेयी उद्यान, कोल्हापूरमधील रंकाळा, पंचगंगा घाट, छत्रपती संभाजीनगर मधील विद्युत रोषणाई, नागपूरमधील ग्लोगार्डन, रामझूला, अशा अनेक ठिकाणी त्यांनी उल्लेखणीय कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन अनेक संस्था, संघटनाकडून गौरविण्यात आले आहे. क्षेत्र कुठलेही असो, आपला फोकस आपल्या कामावर, कामातील वेगवेगळ्या कल्पकतेवर असला पाहिजे. जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास असल्यास अशक्य काहीच नाही. इलेक्ट्रीक क्षेत्र हे महिलांसाठी अलौकीक असताना, त्यामध्ये फक्त पुरुषांचीच मक्तेदारी होती, ती मोडीत काढत आपल्या कार्याचा ठसा उमटविला असल्याची भावना उद्योजिका वंदना चौव्हाण यांनी व्यक्त केली.






# राज्य उत्पादन शुल्ककडून राज्यातील सर्वाधिक मुद्देमाल जप्तीची कारवाई

## राज्यातील सर्वाधिक मुद्देमाल जप्तीची कारवाई पुणे जिल्ह्यात : जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने राज्यात सर्वाधिक ७ कोटी ६३ लाख ३४ हजार रुपयाहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. संपूर्ण राज्यातील सुमारे २५ टक्के जप्तीची कारवाई पुणे जिल्ह्यात झाली असून उत्कृष्ट कामगिरीबद्दल डॉ. दिवसे यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पुणे जिल्ह्याचे अधीक्षक चरणसिंह राजपूत यांचे अभिनंदन केले आहे.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईच्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२४ पासून विविध पथके तयार करण्यात आली. या पथकांनी केलेल्या कारवाईत १ हजार ९०० गुन्हे नोंदविण्यात आले असून १ हजार ४२ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत २३४ वाहनासह ७ कोटी ६३ लाख ३४ हजार २३१ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

राज्य उत्पादन शुल्कचे अंमलबजावणी व दक्षता सह आयुक्त प्रसाद सुर्वे व विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक चरणसिंह राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली आहे. या पथकांकडून जिल्ह्यातील सर्व हातभट्टी निर्मिती, वाहतूक, विक्री, तसेच धाबे, अवैध ताडी धंदे यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांत १ हजार ४२ वारस व ५८ बेवारस गुन्ह्यांचा समावेश आहे. एकूण बिअर ३ हजार ९५१ ब.लि., कॅप्स-३२, देशी दारू- ४ हजार ४९८ ब.लि. विदेशी दारू (राज्यातील)- ४ हजार ५२ ब.लि., विदेशी मद्य (परराज्यातील गोवा)- २३३ ब.लि., लेबल संख्या- १० हजार ९३० ब.लि., अवैद्य गावठी हातभट्टी दारू १ लाख १५ हजार ५६४, गावठी हातभट्टी दारू निर्मितीचे रसायन २ लाख ७९ हजार ३८० ब.लि, वाईन ४८५ ब.लि, ताडी ६ हजार २७५ लिटर व इतर ६२२ ब.लि तसेच २३४ वाहने असा एकूण ७ कोटी ६३ लाख ३४ हजार २३१ रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# पीएमआरडीए लॉटरीची मुदत वाढूनदेखील लाभापासून वंचित

## नागरिकांना सिक्युरिटी प्रमाणपत्र नूतनीकरण न केल्याचा बसला फटका

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण अंतर्गत उभारण्यात आलेल्या गृह प्रकल्पासाठी लॉटरी काढण्यात आली आहे. या प्रकल्पाला नागरिकांचा कमी प्रतिसाद मिळाल्याने मुदतवाद घेण्याची नामुष्की आली होती. त्यात आता मुदत संपण्यासाठी दहा दिवस बाकी असताना, विस्कळीत झाले. संकेतस्थळाला सुरक्षितेसाठी असलेले प्रमाणपत्र पीएमआरडीएने नूतनीकरण करणे आवश्यक आहे. मात्र, ते वेळेत न केल्याने गेल्या आठ दिवसापासून अर्ज भरण्यास अडचण येत होती.




पीएमआरडीएच्या पेठ क्रमांक १२ येथील ४ हजार ८८३ सदनिका आणि पेठ क्रमांक ३०-३२ येथील ७९२ सदनिकांचा सर्व सुविधांयुक्त असा सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांचा भव्य प्रकल्प साकारण्यात आला आहे. मात्र यामधील सदनिकांची विक्री न झाल्याने त्यापैकी अनेक घरी रिकामी होती. या शिल्लक असलेल्या एकूण १ हजार ३३७ सदनिकांसाठी इच्छुक नागरिकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. नागरिकांचा फारसा प्रतिसाद न मिळाल्याने तसेच अधिकाधिक नागरिकांची मुदत वाढीची मागणी पाहून आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी ३० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानंतर संकेतस्थळाला नोंदणी करणारे तसेच, अनामत रक्कम भरण्याची संख्या देखील वाढली.

दरम्यान, गेल्या आठवड्यातील शुक्रवारपासून संकेतस्थळाला एरर येत असल्याने अखेर अनेकांनी अर्ज भरण्याकडे दुर्लक्ष केले. शुक्रवारी प्रमाणपत्र अपडेट नसल्याने संबंधित संकेतस्थळ बंद करण्यात आले होते. सिक्युअर सॉकेट सर्टिफिकेट याची मुदत संपली होती. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यापासून ते नूतनीकरणासंदर्भात प्राधिकरणाकडे संबंधित विभागला कळवण्यात आले होते. एलआयसी (नॅशनल इन्फॉर्मेटिक सेंटर) यांच्याकडून त्याबाबत सूचना केली जाते. त्यानंतर ते नुकतेच प्रमाणपत्र नूतनीकरण केल्यानंतर संकेतस्थळ सुरू झाले. यानंतर नागरिकांसाठी ते संकेतस्थळ विनाअडथळा वापरण्यात सुरुवात झाली.

# मतमोजणी निमित्त शहरात वाहतुकीत बदल

## थेरगाव, बालेवाडी, भोसरी, तळेगावमधील वाहतुकीत बदल : चिंचवड विधानसभा निवडणुकीची थेरगावात मतमोजणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी थेरगाव येथील कामगार भवन येथे होणार आहे. भोसरी, पिंपरी मतदारसंघाची मतमोजणी बालेवाडी क्रीडा संकुलात तर, मावळ मतदारसंघाची मतमोजणी तळेगाव दाभाडे येथील नुतन विद्यालयात होणार आहे. या मतमोजणी निमित्त परिसरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. मतमोजणी निमित्त शनिवारी (दि. २३) वाकड, हिंजवडी आणि तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिले आहेत.

### थेरगावातील वाहतुक बदल

वाकड वाहतुक विभागा अंतर्गत तापकीर चौक येथून थेरगावकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने काळेवाडी रोडने काळेवाडी फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील. काळेवाडी पोलीस स्टेशन येथून तापकीर चौकाकडे जाणारी वाहने पाण्याची टाकी मार्गे इच्छित स्थळी जातील. माध्यमीक विद्यालय थेरगाव समोरील चौकातून तापकीर चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने माध्यमिक विद्यालय थेरगांव समोरील चौकातून उजवीकडे वळून ग प्रभागच्या रोडने इच्छित स्थळी जातील.

### बालेवाडीतील वाहतुकीत बदल

हिंजवडी वाहतूक विभागा अंतर्गत गोदरेज सर्कल, म्हाळुंगे गाव ते राधा चौक व राधा चौक ते म्हाळुंगे गाव ते गोदरेज सर्कल या रस्त्यावरील जड व अवजड वाहने चांदे-नांदे येथून डावीकडे वळून माण व हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील. बाणेर रोड व राष्ट्रीय महामार्गावरुन येणारी जड अवजड वाहने राधा चौकातून उजवीकडे वळून वाकड नाका मार्गे हिंजवडी व इच्छित स्थळी जातील. बालेवाडी स्टेडीयम मेनगेट समोरील रस्त्यावर गोदरेज सर्कल व म्हाळूंगे गावातून येणारी - जाणारी हलकी वाहने उत्तम स्विट चौक येथून उजवीकडे वळून म्हाळुंगे पोलीस चौकीपासून पुढे मुख्य रस्त्याने राधा चौक येथून इच्छित स्थळी जातील.

बधलवाडी चाकणकडून मुंबईच्या दिशेने जाणारी हलकी वाहने व दुचाकी जनसेवा वाचनालय इंद्रायणी कॉलेज येथून हिंदमाता भुयारी मार्ग, शांताई सीटी कार्नर, बीएसएनएल कॉर्नर, मंत्रासिटी रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.


चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी महापालिका कर्मचारी महासंघाचे थेरगाव येथील स्व. शंकर (अण्णा) गावडे कामगार भवनात शनिवारी दि. २३ नोव्हेंबरला होणार आहे. सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू होईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली.

### तळेगावातील वाहतुकीत बदल

» तळेगाव दाभाडे वाहतूक विभागा अंतर्गत मुंबईकडून तळेगाव - चाकण रोडने एचपी चौकाकडे जाणारी जड व अवजड वाहने वडगाव फाटा एमआयडीसी रोड मार्गे वडगाव कमान येथे डावीकडे वळून तळेगाव, नवलाख उंब्रे, बधलवाडी भामचंद्र डोंगर, आंबेठाण एचपी चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील. मुंबईकडून चाकणच्या दिशेने जाणारी हलकी वाहने व दुचाकीस वडगाव फाटा निलया सोसायटी कार्नरकडून मंत्रा सिटी रोड मार्गे बीएसएनएल कॉर्नर, सीटी कार्नर, हिंदमाता भुयारी मार्ग येथे उजवीकडे वळून चाकण बाजुकडे जातील. चाकण एचपी चौकाकडून मुंबईच्या दिशेने जाणारी जड व अवजड वाहने एचपी चौक आंबेठाण, भामचंद्र डोंगर, नवलाख उंब्रे, तळेगाव एमआयडीसी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

# आळंदीत निनादणार 'ग्यानबा-तुकाराम'चा गजर

## माऊलींच्या 728 व्या संजीवन समाधी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर : विठूरायाची पालखी आळंदीकडे मार्गस्थ



**पिंपरी | प्रतिनिधी**

संजीवन समाधी सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानकोपऱ्यातून भाविक अलंकापुरीत दाखल होत असून माऊलींच्या ७२८ व्या संजीवन समाधी सोहळ्याची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती आळंदी देवस्थानच्या वतीने देण्यात आली आहे. सर्व वारकरी भाविक भक्तांना आता आळंदीच्या कार्तिकी एकादशीची आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याची ओढ लागली आहे. दरवर्षी लाखो वारकरी भाविक हा सोहळा याची देही याची डोळा अनुभवत असतात. यावर्षी २३ नोव्हेंबरपासून माऊलींचा संजीवन समाधी सोहळा सुरु होत आहे.

माऊली मंदिरात होणाऱ्या पारंपरिक कार्यक्रमाची पत्रिका जाहीर झाली आहे. कैवल्यचक्रवर्ती ज्ञानेश्वर महाराजांचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा यंदा २३ नोव्हेंबर ते १ डिसेंबरच्या दरम्यान पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठलाची पालखीसुद्धा काही आठवड्यांपूर्वी पंढरपूरहून आळंदीच्या दिशेने मार्गस्थ झाली आहे. या सोहळ्याची सुरुवात २३ नोव्हेंबर रोजी परंपरेनुसार संजीवन समाधी मंदिरासमोरील महाद्वारवर असलेल्या हैबतबाबा यांच्या पायरी पूजनाने होणार आहे, तर मुख्य संजीवन समाधी सोहळा हा २८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते १२.३० च्या दरम्यान होणार आहे. या सोहळ्याची सांगता १ डिसेंबर रोजी रात्री ९.३० ते १२.३० च्या दरम्यान माऊलींच्या छबीना मिरवणुकीने होणार आहे. या कालावधीत माऊलींच्या संजीवन समाधीवर दररोज पवमान अभिषेक, दुग्धारती, महापूजा , नैवद्य ,भजन ,कीर्तन ,पारायण हे परंपरेनुसार होणार असल्याची माहिती देवस्थानच्या वतीने देण्यात आली आहे.

### संजीवन समाधी सोहळ्यातील प्रमुख कार्यक्रमाची रूपरेषा

» २३ नोव्हेंबर सकाळी ७ ते ९ च्या दरम्यान संजीवन समाधी मंदिराच्या महाद्वारावर परंपरेनुसार हैबतबाबा यांचे पायरी पूजन गुरू हैबतबाबा यांच्या वंशजांच्या हस्ते..

» २६ नोव्हेंबर दुपारी १ वाजता माऊलींची नगर प्रदक्षिणा होईल.

» २७ नोव्हेंबर दुपारी ४ ते ७ दरम्यान माऊलींचा रथोत्सव संपन्न होईल.

» २८ नोव्हेंबर सकाळी ९ ते १२ पर्यंत हभप नामदास महाराज दास यांचे कीर्तन त्यानंतर दुपारी १२ दरम्यान मुख्य संजीवन समाधी सोहळा आणि माऊलींच्या समाधी मंदिरावर पुष्पवृष्टी, घंटानाद आणि आरती होईल.

» १ डिसेंबर रात्री ९.३० ते १२.३० च्या दरम्यान माऊलींचा छबिना निघेल. त्यानंतर आरती होईल.

# 7.93 लाख जास्त मतदारांनी बजावला मताधिकार

## लोकसभेनंतर मतदार याद्यांमध्ये तब्बल 5 लाख 13 हजार 843 मतदारांची भर

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीमध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील एकूण २१ मतदारसंघामध्ये मतदान पार पडले. लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारयाद्यांमध्ये नाव नसणे, नाव वेगळे फोटो वेगळे, पत्त्यांमधील गोंधळ झाला होता. त्यामुळे हजारो मतदारांना मतदान करता आले नव्हते. त्यामुळे मतदारयाद्यांमध्ये नावे समाविष्ट करण्यासाठी विशेष यंत्रणा राबवण्यात आली.



होती. परिणामी पुणे लोकसभा मतदारसंघात एकूण ११ लाख ४ हजार ५७२ मतदारांनी मतदान केले होते. त्यामध्ये तब्बल ७ लाख ९३ हजार ३४२ मतदारांची भर पडल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिली.

पुणे लोकसभा मतदारसंघामध्ये ५४.०३ टक्के मतदान झाले होते. तर विधानसभेसाठी पुण्यात सरासरी मतदानाची टक्केवारी ६१.०५ टक्के इतकी झाली आहे. तुलनात्मक दृष्टीने लोकसभा मतदारसंघात एकूण ११ लाख ४ हजार ५७२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. त्यामध्ये ७ लाख ९३ हजार ३४२ मतदारांची भर पडल्यामुळे ७ टक्क्यांनी मतदान वाढल्याचे समाधान असल्याचे जिल्हाधिकारी दिवसे यांनी सांगितले.

लोकसभेत सर्व विधानसभा क्षेत्रांमध्ये मतदारयाद्यांमध्ये गोंधळ होता. त्याची गंभीर दखल घेत ६० हजार अर्ज भरून घेतले होते. परिणामी ५ लाख १३ हजार ८४३ नव्या मतदारांची भर पडली. तसेच पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ आणि शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते.तब्बल २५०० हून जास्त अशी मतदान केंद्रे आम्ही ओळखली ज्या ठिकाणी ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते. त्याठिकाणी त्यासाठी विशेष मतदार जनजागृती अभियान, कमी अंतरावर मतदान केंद्रांची उभारणी, रहिवासी सोसायट्यांमध्ये मतदानकेंद्र उभारण्यात आले होते. त्यामुळे एकूण मतदानाची टक्केवारी वाढली,असेही त्यांनी सांगितले.

गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रांमुळे मतदार घराबाहेर पडल्याचे चित्र दिसून आले. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या तब्बल २५१०५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी टपाली मतदान केले. त्यापैकी ११४५८ पोलिसांनी मतदानाचा हक्क बजावला. ८५ वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या एकूण १८४४ ज्येष्ठ नागरिकांना गृहमतदानाची संधी उपलब्ध करून दिली होती. ३१० दिव्यांग मतदारांनीही घरातून मतदानाचा हक्क बजावला. तसेच भारतीय लष्करातील सैनिकांचे ५५०५ मतदान झाले असून ऑनलाईन ईटीबीपीएस सुविधेतून ४३३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्यामुळे मतदान सुरळीत पार पडल्याचे जिल्हाधिकारी दिवसे यांनी सांगितले.

### मतमोजणीची जय्यत तयारी

» पुणे शहरातील ८ विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी भारतीय खाद्य निगम कोरेगाव पार्क येथील गोदामात ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. तर पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळचे ईव्हीएम श्री शिवछत्रपती क्रीडा संकूल बालेवाडी येथे सुरक्षित ठेवण्यात आले आहेत. तर ज्या त्या तालुक्यात जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचे ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. येत्या शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी सकाळी ८ वाजता सुरू होईल. टपाली मतमोजणी नंतर ईव्हीएमच्या मतमोजणी केली जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिली.

# नवीन लाल कांद्याच्या आवकेत मोठी वाढ!

## जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात नवीन लाल कांद्याची आवक वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात नवीन लाल कांद्याची आवक वाढली आहे. मंगळवारी (दि. 19) लिलावात 9 हजार 700 गोणी नवीन कांदा विक्रीस आला होता. प्रति 10 किलोस गावरान कांद्यास 711 रुपये व नवीन कांद्यास 510 रुपये असा भाव मिळाला, अशी माहिती सभापती संजय काळे, उपसभापती प्रितम काळे यांनी दिली.

साठवून ठेवलेल्या गावरान कांद्याची विक्री शेतकऱ्यांनी केल्याने या कांद्याची आवक कमी झाली आहे. त्यातच पावसाळ्यात पेरणी व लागवड झालेला लाल सेंद्रिय नाशिक कांदा आता सर्वत्र विक्रीस येत आहे.



या कांद्याच्या काढणीने वेग घेतल्याने विक्रीस येण्याचे प्रमाण वाढले आहे. आळेफाटा उपबाजारातही या कांद्याची आवक चांगलीच वाढली आहे. जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील व शेजारील पारनेर व संगमनेर तालुक्यातील हा कांदा विक्रीस येत आहे. या कांद्याचे विक्रीस येण्याचे प्रमाण वाढणार आहे.

त्यातच या कांद्यास भाव चांगले मिळतात, मात्र पावसाचा फटका या कांद्याचे उत्पादनावर झाला आहे. मंगळवारी झालेल्या लिलावात 10 हजार 700 गोणी कांदा विक्रीस आला होता. यातील 1 हजार गोणी गावरान कांदा होता, अशी माहिती सचिव रूपेश कवडे, कार्यालय प्रमुख प्रशांत महांबरे यांनी दिली.

### ढगाळ हवामानाने कांदा उत्पादक चिंतेत

मांदळेवाडी, वडगावपीर, लोणी, धामणी परिसरात गेल्या 15 ते 20 दिवसांपासून ढगाळ हवामानाचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळे कांद्याच्या फवारणीच्या खर्चात मोठी वाढ झाल्याने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत.

चालू वर्षी कांद्याला चांगला बाजारभाव मिळत असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणावर कांदा लागवड करण्यात आली. या परिसरात काही शेतकऱ्यांचा कांदा एक ते दीड महिन्यांचा झाला आहे, तर काही शेतकरी अजूनही कांदा लागवड करत आहेत.

मात्र सध्या या परिसरात बदलत्या हवामानामुळे, कांदा पिकावर आळी, मावा, तुडतुडे या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असल्याने पाती करपण्यास सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांना कांदा फवारणी करावी लागत असल्याने खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. परिणामी मोठी आर्थिक झळ शेतकऱ्यांना सहन करावी लागणार आहे.